REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 7 | ISSUE - 12 | SEPTEMBER - 2018

# वारकरी संतांचा मानवतावाद

**प्रा. डॉ. संभाजी जाधव**
**मराठी विभागप्रमुख , कै. बाबासाहेब देशमुख गोरठेकर महाविद्यालय, उमरी , ता. उमरी जि. नांदेड.**

**प्रस्तावना :**

वारकरी संतांचा मानवतावाद हा विषय सर्वकाळात उपयुक्त व महत्त्वपुर्ण असा विषय आहे. वारकरी संत मानवतावादी आहेत, असे म्हणण्यास पुष्कळ वाव आहे. कारण मानवतावादाचे जे अनेक अर्थ आहेत, त्यांत स्वतंत्र विचार करणे व वर्तन करणे, असा एक अर्थ अभिप्रेत आहे. ''मानवतावाद ही संकल्पना संदर्भानुसार विविध अथांनी वापरली जाते. माणुसकी व मानवधर्म ह्यापासून मानवतावाद ही संकल्पना पूर्णपणे भिन्न आहे. मानवतावाद हा शब्द अधिदैवतवादाच्या विरुद्ध अर्थाचा शब्द म्हणून रूढ झाला. मानवतावादात धर्मविचारांचे निरपेक्ष स्वतंत्र असे चिंतन होत असते. म्हणून मानवतावादी मुक्त विचारवंत असतात. मनुष्य हा विश्वाचा मापदंड होय, असेही मानवतावादात मानले जाते.''[०१] मानवतावादाप्रमाणेच संतांनी मनुष्य हा केंद्रबिंदू मानून विचार केला. मानवी जीवन सुदृढ, समृद्ध झाले पाहिजे, त्यांच्या जीवनातील दुःख कमी होऊन तो आनंदी व्हावा, यासाठी संतांनी विठ्ठलभक्तीच्या माध्यमातून जीवनादर्श विचार लोकांत रुजवण्याचे प्रयत्न केले. म्हणून वारकरी चळवळ केवळ पारमार्थिक चळवळ न राहता ती सामाजिक चळवळ ठरते, असे मला वाटते. याविषयी म. गो. रानडे म्हणतात, ''.......विधी व उपचार, ज्ञानार्जन व चिंतन, यात्रा व उपोषणे यापेक्षा ईश्वरावर दृढ प्रेम व विश्वास ठेवून त्याचे भजन करण्याचे महत्त्व जास्त आहे, असे संतांनी सिद्ध केले. अनेक देवतांपासून होणाऱ्या अत्याचारांचा ओघ कमी केला. या सर्व संतांनी राष्ट्रास आचारशक्ती व विचारशक्ती यामध्ये परधर्मीय सत्तेच्या ठिकाणी एकजुटीची एतद्देशीय सत्ता पुन्हा प्रस्थापित करण्याच्या महान कृत्यात पुढारीपणा घेण्यास महाराष्ट्र देशाची तयारी करून दिली.''[०२] यावरून संत स्वतंत्र विचार व वर्तन करून तत्कालीन समाजाला अनिष्ट रूढींतून सोडवू इच्छित होते असे लक्षात येते. केवळ माणूस हा त्यांचा केंद्रबिंदू होता. जात, धर्म, पंथ ह्यापलीकडे त्यांचा दृष्टिकोन असून, राष्ट्रनिर्मिती हा विचार त्यांच्या कल्पनेत असावा. यासाठी संतांनी समाजात अगोदरपासून परंपरेने जी मूल्ये चालत आलेली होती, जे आदर्श समाजात प्रचलित होते, त्यांचा वापर समाजोद्धार करण्यासाठी केला, तो करताना काळानुसार त्यात आवश्यक ते परिवर्तन करून घेतले.

संत नामदेवांनी समाजविकासासाठी अनेक मूल्यांचा पुनर्विचार केला. त्यात त्यांनी ईश्वराला मानव पातळीवर आणले. परमेश्वराचे हे मानुषीकरण केले. ते मानवतावादाचे महत्त्वाचे वैशिष्ट्यच आहे. असे करताना संत नामदेव म्हणतात, ''पतित पावन नाम ऐकुनी आलो मी द्वारा । पतितपावन नव्हेसी म्हणुनी जातों माघारा ।।१।। घ्यावें तेव्हां द्यावे ऐसा अससी उदार । काय धरूनि देवा तुझें कृपणाचें द्वार ।।२।।''[०३] अशा अभंगातून नामदेव विठ्ठलाला दोन शब्द ऐकवतात. प्रसंगी सामान्य माणसाचे श्रेष्ठपण सांगून जनसामान्यांची प्रतिष्ठा वाढविण्याचा प्रयत्न करताना दिसतात. पुढे ते मानवी कर्तृत्व श्रेष्ठ



ठरवून त्याचा गौरव करताना संतांचे आदर्श जीवन समाजासमोर ठेवतात. सामान्य माणूस केवळ उपजीविकेसाठी अहोरात्र कष्टतो आहे. त्याशिवाय त्याला जीवनात मौल्यवान काही दिसत नाही. हे काही योग्य नाही, याची जाणीव त्यांना होती. म्हणून सामान्य माणसाला उपदेश करताना ते म्हणतात, ''वीतभर पोट लागलेंसे पाठी । साधुसंगे गोष्टी सांगू न देई ।।१।। पोट माझी माता पोट माझा पिता । पोटानें ही चिंता लाविलीसे ।।२।। पोट माझा बंधु पोट माझी बहीण । पोटानें हें दैन्य मांडिलीसे ।।३।। विष्णुदास नामा पोटाकडे पाहे । अझुन किती ठाये हिंडविशीर।।४।।''[०४] पोटाने मानवी जीवनात दैन्य मांडले असून, रात्रंदिवस व्यक्ती

त्याच्याच विचारात आहे. पोट म्हणजेच सर्वस्व आहे, असे वाटते; पण वास्तविक जीवनात ते सर्वस्व नसून, मानवतावादी दृष्टीने जीवन जगण्यास फार कांही कष्ट लागत नाहीत. तर, आदर्श, सुंदर जीवन व्यक्तीने जगावे. एकूणच मानवी उन्नतीसाठी संत नामदेवांची धडपड दिसून येते. माणसांनी एकमेकांवर प्रेम करावे, व्यक्तींतील दुजाभाव नष्ट व्हावा, सत्यनिष्ठा, सौजन्य, सहिष्णुता यांचे संवर्धन व्हावे, असे त्यांना वाटते.

संत ज्ञानेश्वर व त्यांच्या भावंडांना दुःखाच्या आणि अवहेलनेच्या अनुभवातून जावे लागले तरी त्यांचा समाजाकडे पाहण्याचा मानवतावादी दृष्टिकोन किंचितही ढळला नाही. मानवी जीवनाचे महत्त्व सांगताना ज्ञानेश्वर म्हणतात, ''दुर्लभुरे दुर्लभुरे दुर्लभु संसारू तुम्हीं कां नेणा । आहारनिद्रेसाठीं दवडितां माणुसपणा ।।१।।आड न विहिरी बावि न पोखरणी । सरिता ना सागर कल्पतरू रानोरानीं ।।२।। बा याची खुण ज्ञानदेवो जाणे । तयाचें करणें तैं अधिकचि होणें ।।३।।''[०५] संसार महत्त्वपूर्ण असून केवळ आहार व निद्रा यांमध्ये वेळ दवडविणे योग्य नाही. जीवनात चांगूलपणास महत्त्व दिले पाहिजे, याची जाणीव ज्ञानेश्वर समाजास करून देतात. मानवी जीवनात दुजेपणास दूर सारले पाहिजे. शिवाय आपण समाजाचे काही देणे लागतो, या विचाराची आठवणही ते अनेक अभंगांतून करून देतात.

संत निवृत्तिनाथ यांच्या अभंगांतील विविधता विपुल आहे. भक्ती तत्वज्ञान, बाळक्रीडा, कृष्णभक्ती यांतून निवृत्तिनाथांचा मानवतावादी दृष्टिकोन व्यक्त होतो. ''शांति क्षमा दया सर्वभावें करुणा । तोचि नारायणा आवडे दासु ।।१।। तोचि एक साधु बोलिजे पैं जनीं । निरंतर ध्यानीं कृष्णमूर्ति ।।२।।''[०६] ज्याच्याकडे शांती, दया, करुणा, क्षमा आहे, तोच परमेश्वरास आवडतो. हा व्यापक व नवीन दृष्टिकोन आहे. तो मानवतावादी पातळीवरील असून, या गुणांनी युक्त असा समाज त्यांना अभिप्रेत आहे. वारकरी संप्रदायाच्या सुरुवातीच्या काळात असा मानवतावादी दृष्टिकोन व्यक्त करून निवृत्तिनाथांनी वारकरी संप्रदायाची पायाभरणीच मानवीय उपयुक्तता या विचारावर केली आहे.

संत चोखामेळ्यांनी अनेक अभंगांतून मानवतावादी विचार व्यक्त केले आहेत. सर्व माणसे समान, हा विचार मानवतावादामध्ये अभिप्रेत आहे. तोच विचार संत चोखामेळ्यांनी व्यक्त केला आहे. ''कांहो केशिराजा दूजे पैं धरितां । हें तों आश्चर्यता वाटे मज ।।१।। एकासी आसन एकासी वसन । एक तेचि नग्न फिरताती ।।२।। एकासी कदान्न एकासी मिष्टान्न । एका न मिळे कोरान्न मागतांचि ।।३।। एकासीं वैभव राजयाची पदवी । एक गांगावेगांवी भीक मागे ।।४।। हाचि न्याय दिसतो कीं घरी । चोखा म्हणे हरि कर्म माझें ।।५।।''[०७] सर्व माणसे समान आहेत; पण समाज एकाला श्रेष्ठ दुसऱ्याला कनिष्ठ समजतो, याचे आश्चर्य व्यक्त करताना चोखा मेळा प्रत्यक्ष परमेश्वरालाच प्रश्न करतात की, एकाला आसन दुसऱ्याला वसन, एकाला भरपूर वस्त्र दुसरा नग्न, एकास मिष्टान्न दुसऱ्यास कदान्न, एकाला राज्याचे वैभव तर दुसरा भिकारी हा न्याय परमेश्वरा तुमच्या दरबारात कसा काय आहे, असा प्रश्न ते विचारतात. समाजात त्यांना समानता अभिप्रेत होती, ती मानवतावादी दृष्टिकोनातून, असे वाटते.

संत एकनाथ यांनी आपल्या विपुल अभंगरचनेतून व प्रत्यक्ष आचरणातून मानवतावादी भूमिका घेतल्याचे जाणवते. परमेश्वर सर्वाभूती आहे. त्यामुळे भेदभाव योग्य नाही, अशी भूमिका घेताना ते म्हणतात, ''नको दुजीं रे वासना । मिठी घाली संतचरणा । पंढरीचा राणा । आपोआप ऱ्हदयी ।।१।। हाचि धरी रे विश्वास । सांडी वाउगा हव्यास । नको आशा तृष्णा पाश । परतें टाकीं सकळ ।।२।।....... सर्वाभूती देव आहे । सर्व भरूनी उरला पाहे । रिता नाही कोठें ठाव । देवाविण सर्वथा ।।४।। म्हणोनि नको भेदभाव । एक वचनीं एक ठाव । एका जनार्दनी स्वयमेव । देव उभा पंढरी ।।५।।''[०८] यातून त्यांची मानवतावादी भूमिका स्पष्टपणे व्यक्त होते. द्वेषभाव दूर केला म्हणजे पंढरीचा राजा आपोआप ऱ्हदयात येतो, हा विचारच मुळात मानवतावादी आहे. अनावश्यक हव्यास सोडून दया करण्याने सर्वठायी परमेश्वर येतो, देव जर सगळीकडे आहे, तर सर्व समान आहेत, ही भूमिका मानवतावादी आहे, असे वाटते.

संत तुकारामांच्या अभंगवाणीतून व्यक्त झालेला मानवतावादी दृष्टिकोन हा व्यापक असून वारकरी संप्रदायात अशी निखळ भूमिका घेणारे ते एकमेव संत आहेत. (स्व) बरोबर समाजाचाही उद्धार व्हावा, अशी ज्ञानेश्वरांपासून ते निळोबांपर्यंत सर्वच संतांची भूमिका होती. पण, मागील परंपरेचा अभ्यास करून त्या भूमिकेची नव्याने व आत्मविश्वासाने तुकारामांनी पुनर्मांडणी केली आहे. हे विचार केवळ मांडून ते थांबले नाहीत, तर ते प्रत्यक्षात उतरले पाहिजेत, याचा आग्रह त्यांनी धरला. ''ज्या धर्माच्या अधिष्ठानावर समाजजीवनाची इमारत समर्थपणे उभी राहू शकते, असा मानवधर्म तुकारामांनी आपल्या अभंगाद्वारे व्यक्त केला. परस्परांचा द्वेष करू नये, निंदा करू नये, कोणीही कोणाला कमी लेखू नये. थोडक्यात, माणसाने माणसाशी माणसासारखे वागले पाहिजे, हे तुकोबांच्या मानवतावादी धोरणाचे सार आहे.''[०९] दुःखपीडित दीनदुबळ्यांची बाजू घेताना तुकोबा म्हणतात, ''आर्तभूतांप्रति । उत्तम योजाव्या त्या शक्ति ।।१।। फळ आणि समाधान । तेथें उत्तम कारण ।।२।। अल्पें तो संतोषी। स्थळी सांपडे उद्देसीं ।।३।। सहज संगम तुका म्हणे तो उत्तम ।।४।।''[१०] दुःखी,

दुबळ्या लोकांसाठी उत्तम शक्तीची योजना करणे, हा विचार मानवतावादी आहे. त्यामुळे दुबळ्यांचे सबलीकरण होते. तसे होणे त्यांना अभिप्रेत आहे. पांडुरंगा, तुमच्या मुखावरून भाव समजतो, शरणांगताची उपेक्षा करणे योग्य नाही, असे ते म्हणतात, "अहंकार तो नासा भेद । जगीं निंद्य बोंवळा ।।१।। नातळे तो धन्य यासी । झाला वंशीं दीपक ।।२।। करवितो आत्महत्या । नेदी आप्ता (सत्या) आतळों ।।३।। तुका म्हणे गुरूगुरी । माथं थोरी धरोनि ।।४।।"[११] या जगात निंद्य ओवळा माणूस नसून अहंकार आहे. मी, तूपणा आहे तो नष्ट  झाला पाहिजे. खोट्या अभिमानाचे ओझे डोक्यावर बाळगण्यात काय अर्थ आहे. हा विचार समाजातील अनेक अपप्रवृत्तींवर प्रहार करणारा आहे व मानवतावादी भूमिका घेणारा आहे, असे वाटते.

## संदर्भ सूची


०१. काळे प्र.भा., नामाचा तुका, जगद्गुरू तुकोबाराय साहित्य परिषद, उमरखेड, प्रथमावृत्ती २००२, पृष्ठ-१९९-२००.
०२. तत्रैव, पृष्ठ-२००.
०३. श्रीनामदेव गाथा, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, पुनर्मुद्रण २००८, पृष्ठ-६५९.
०४. तत्रैव, पृष्ठ-५७५.
०५. श्री सकलसंतवाणी (खंड पहिला), गीता प्रेस, गोखपूर, चतुर्थ पुनर्मुद्रण, पृष्ठ-६९.
०६. तत्रैव, पृष्ठ-१४०.
०७. तत्रैव, पृष्ठ-३०६.
०८. श्री सकलसंतवाणी (खंड दुसरा), गीता प्रेस, गोरखपूर, चतुर्थ पुनर्मुद्रण, पृष्ठ-१८७.
०९. काळे प्र. भा., नामाचा तुका, जगद्गुरू तुकोबाराय साहित्य परिषद, उमरखेड, प्रथमावृत्ती २००२, पृष्ठ-२४३.
१०. बेणारे गोपाळराव गोविंद(संपा.), सार्थ तुकाराम गाथा, शारदा साहित्य, पुणे, पृष्ठ-१८७.
११. तत्रैव, पृष्ठ-५०३.